
बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - 89 ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540

दैनिक रविवार, १ मार्च २०२६ आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

TRENDING NEWS

राजपाल यादव म्हणाला- माझ्याकडे ₹1200 कोटींचे काम आहे:तरीही प्रकरण तुरुंगापर्यंत पोहोचले, तक्रारदाराने मालमत्तेची कागदपत्रे आणि सुरक्षा रक्कम नाकारली



पान 3 वर

# SHORT NEWS

## हटकल्याने शेतकऱ्यावर दगडफेक

**यवतमाळ शहर :** शेतात मोटार चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या इसमांनी विचारपूस केली असता शेतकऱ्यावर दगडफेक केल्याची घटना डोर्ली शेतशिवारात घडली. २६ फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी प्रितम भास्कर नागरगोजे (३२) यांनी शेतात आलेल्या दोन संशयितांची चौकशी केली. यावेळी आरोपी क्रमांक २ तिथून पळून गेला, तर आरोपी प्रकाश वसंतराव इंदुरकर (२०, रा. खानगाव) याने प्रितम यांना दगड मारून कपाळावर व नाकावर जखमी केले. शेजारील शेतकरी मदतीला धावून आले असता आरोपीने आपण 'पाणी पिण्यासाठी आलो होतो' अशी बतावणी केली. यवतमाळ शहर पोलिसांनी याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## ५० हजारांची सुझुकी चोरीला

**लोहारा :** यवतमाळ येथील दारव्हा रोडवरील टीव्हीएस शोरूम परिसरातून अज्ञात चोरट्याने एक महागडी दुचाकी लंपास केली. ही चोरी १७ ते २२ फेब्रुवारी २०२६ च्या दरम्यान घडली असून २७ फेब्रुवारी रोजी याची पोलिसांत नोंद करण्यात आली. फिर्यादी बंटी देवराव थोरात (४०, रा. नेताजी नगर, यवतमाळ) यांची सुझुकी ॲक्सेस १२५ मोटारसायकल (क्रमांक एमएच २९ सीडी ९०८९) अज्ञात आरोपीने शिताफीने चोरून नेली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची किंमत ५० हजार रुपये आहे. लोहारा पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून परिसरात बसवलेल्या सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत तपास सुरू आहे.

## वणीत वाहन दुरुस्तीच्या वादातून टामीने हल्ला

**वणी :** टायर पंचरच्या दुकानात वाहन दुरुस्ती करण्याच्या कारणावरून झालेल्या वादात चौघांनी मिळून दोघांना टामीने मारहाण केल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता घडली. फिर्यादी मोहम्मद जैनुद्दीन (४२, रा. मेघदूत कॉलनी) यांना आरोपी मोहम्मद रमजाणी, मोहम्मद सलमान, मोहम्मद शकील आणि मोहम्मद राजा यांनी टामीने तोंडावर व पोटावर मारून त्यांचे दात पाडले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या राजेंद्र प्रसाद यांनाही आरोपींनी डोक्यावर टामीने मारून गंभीर जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. वणी पोलिसांनी याप्रकरणी चौघांविरुद्ध संगनमताने हल्ला केल्याचा गुन्हा नोंदवला असून अधिक तपास करत आहेत.

◆ **इस्रायल-इराण युद्ध :** मानतळ बंद; एअर इंडियाची लंडन, पॅरिस, शिकागोला जाणारी उड्डाणे रद्द, जगभरातील फ्लाइट्सवर परिणाम


# दुबईतील बुर्ज खलिफाजवळ हल्ला

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** इस्त्रायल-इराण युद्धादरम्यान मध्यपूर्वेतील परिस्थिती झपाट्याने बिघडली आहे, त्याचे परिणाम दुबईपासून भारतापर्यंत जाणवत आहेत. दुबईतील प्रतिष्ठित स्थळ बुर्ज खलिफाजवळ ड्रोन हल्ला झाला.

खबरदारी म्हणून, बुर्ज खलिफा आधीच रिकामा करण्यात आला आणि त्यातील दिवे बंद करण्यात आले. हल्ल्यानंतर, दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अल मकतूम विमानतळावरील उड्डाणे पुढील सूचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात आली. अनेक देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र तात्पुरते






बंद केले, ज्यामुळे जगभरातील उड्डाणांवर परिणाम झाला. एअर इंडियाने जाहीर केले की १ मार्च रोजी लंडन, टोरंटो, फ्रँकफर्ट, पॅरिस आणि शिकागो येथे जाणाऱ्या सर्व नियोजित उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) विमान कंपन्यांना ११ देशांच्या हवाई क्षेत्रापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. प्रवाशांना विमानतळांवर प्रवास न करण्याचा आणि त्यांच्या विमान कंपन्यांकडून अपडेट्स घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## इस्त्रायल-अमेरिकेचा इराणवर हल्ला, 200 हून अधिक जणांचा मृत्यू

✦ शनिवारी सकाळी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर मोठे हल्ले केले. इराणच्या रेड क्रेसेंट सोसायटीच्या मते, अमेरिका आणि इस्त्रायली हल्ल्यात किमान २०१ लोक ठार झाले आहेत आणि ७४७ जण जखमी झाले आहेत. इराणमधील एका शाळेत क्षेपणास्त्र डागल्याने ८५ विद्यार्थिनी ठार झाल्या आणि ४५ जण जखमी झाले. वृत्तसंस्था रॉयटर्सने सूत्रांच्या हवाल्याने दावा केला आहे की, इस्त्रायली हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि रेव्होल्यूशनरी गार्ड्स (IRGC) कमांडर मोहम्मद पाकपौर यांचा मृत्यू झाला. अमेरिकेच्या सहकार्याने इस्त्रायलने १० इराणी शहरांवर हवाई हल्ले केले. हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी एक व्हिडिओ जारी केला ज्यामध्ये म्हटले आहे की, इराणवरील हल्ला अमेरिकन नागरिकांच्या संरक्षणासाठी करण्यात आला आहे. प्रत्युत्तरादाखल, इराणने इस्त्रायलवर सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आणि कतार, कुवेत, जॉर्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि युएईमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले. शिवाय, इराणने युएईच्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबईवरही हल्ला केला.

CAPTION वऱ्हाडी लालबुंद...



**आला वसंतऋतू रानभर लगबग जशी लगीनघाई**
**मोहरून,बहरून झाडं करत आहे फाल्गुनाची सरबराई**
**शेंड्यावर आकारला,साकारला बघा केशरीया कळस**
**सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे एकाकी रक्तवर्णी पळस**
(शब्द-अजीम नवाज राही.)
(छाया -मुकुंद परळीकर)


# चारठाणा पोलीस ठाणे हद्दीत दागिने चोरी उघड

## स्थानिक गुन्हा शाखा व चारठाणा पोलिसांची संयुक्त कारवाई, दोघे ताब्यात

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ मनोज टाक

**जितुर :** – जिंतूर तालुक्यातील चारठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या लाखो रुपयांच्या दागिने चोरी प्रकरणाचा स्थानिक गुन्हा शाखा व चारठाणा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत उलगडा केला असून एका महिलेसह दोघा आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून चोरीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ८४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




या प्रकरणी चारठाणा पोलीस ठाण्यात गुरनं ४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (२), ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीनुसार घरफोडी करून लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे नमूद करण्यात आले होते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेशी यांच्या आदेशानुसार अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक जीवन बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांनी विशेष पथकाची नियुक्ती केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांच्या नेतृत्वाखाली सिद्धेश्वर चाटे, नामदेव डूबे, राम पोळ, मुकेश बुधवंत, पांडुरंग तूपसुंदर, माणिक डुकरे, जयश्री आव्हाड, विलास सातपुते, उमेश चव्हाण, मधुकर ढवळे, चालक साने आदींच्या पथकाने चारठाणा परिसरात गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवली. यावेळी चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवी, झुजुडे व माने यांनीही सहकार्य केले. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून सांगिता भारत मुंजे व विष्णु उर्फ बाळू काशीनाथ चव्हाण या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या ताब्यातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ८४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सध्या दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी चारठाणा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे. या यशस्वी कारवाईमुळे परिसरातील चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# घुसखोरांविरुद्ध राज्य सरकारची 'झिरो टॉलरन्स' मोहीम:एकाच वर्षात 2376 बांगलादेशी हद्दपार

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** विधान परिषदेमध्ये लक्षवेधी सूचना (कामकाज क्र. ४) अंतर्गत मा. प्रवीण दरेकर यांनी मुंबईतील व्यावसायिक अवैध बांगलादेशी घुसखोरीच्या वाढत्या प्रश्नाबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या विषयावर शून्यसहिष्णुतेची भूमिका घेत आक्रमक कारवाई सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात इंटेलिजन्स आधारित संयुक्त मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक



पोलीस ठाण्यात पाच कर्मचाऱ्यांची विशेष टीम नियुक्त करण्यात आली आहे. एटीएस आणि स्थानिक पोलीस यांच्या समन्वयातून नियमित तपासणी व छापेमारी सुरू आहे.

मागील पाच वर्षांतील आकडेवारी सादर करताना त्यांनी सांगितले की, २०२१ मध्ये १०९, २०२२ मध्ये ७७, २०२३ मध्ये १२७, २०२४ मध्ये २०२ आणि २०२५ मध्ये तब्बल २३७६ अवैध बांगलादेशींना हद्दपार करण्यात आले आहे. एका वर्षात दोन हजारांहून अधिक जणांना हद्दपार करून महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली असल्याचे त्यांनी नमूद केले. केंद्र शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार पुरावे निश्चित झाल्यास गुन्हा दाखल न करताही संबंधितांना थेट बीएसएफच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे कारवाईला अधिक वेग आला आहे. राज्यात प्रथमच डिटेन्शन सेंटर उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कन्स्ट्रक्शन साईट्सवरील कामगारांची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई केली जात आहे. तसेच महानगरपालिका व पोलीस विभाग संयुक्त कारवाईद्वारे फेरीवाल्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करत आहेत. अवैध घुसखोरी रोखण्यासाठी नागरिकांनी संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. राज्याच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदमांनी ठामपणे सांगितले.

# अजित पवारांचे विमान कोसळण्यापूर्वी झाडाला धडकले: प्राथमिक चौकशी अहवाल समोर

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला महिना पूर्ण होत असतानाच, हवाई उड्डाण मंत्रालयाच्या 'एएआयबी' (AAIB) तपास यंत्रणेने या घटनेचा २२ पानांचा प्राथमिक तपास अहवाल प्रसिद्ध केला आहे. विमान जमिनीवर कोसळण्यापूर्वी ते एका झाडाला धडकले होते, अशी माहिती या अहवालातून समोर आली आहे. या प्राथमिक अहवालात अपघाताचे नेमके कारण स्पष्ट नसले तरी, अपघाताला कारणीभूत ठरू शकणाऱ्या अनेक गंभीर त्रुटींवर बोट ठेवण्यात आले आहे. गत २८



जानेवारी रोजी बारामतीजवळ विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. या दुर्घटनेत एकूण पाच जणांचा मृत्यू झाला होता. जवळपास एक महिन्यानंतर डीजीसीएकडून या अपघाताचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. अहवालानुसार, मुंबईहून बारामतीकडे येणाऱ्या या व्हीआयपी (VIP) फ्लाईटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला होता. मात्र, पहिल्या प्रयत्नात वैमानिकाला लँडिंग करता आले नाही, त्यामुळे त्यांनी 'गो-अराउंड' (Go-Around) केला. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने "Field in sight" असा संदेश दिला. परंतु, एअर ट्रॅफिक कंट्रोलने (ATC) त्यावेळी ३ किलोमीटर इतकी दृश्यमानता (Visibility) नोंदवली होती, जी 'व्हीएफआर' (व्हिज्युअल फ्लाईट रूल्स) नियमांनुसार आवश्यक असलेल्या ५ किलोमीटरपेक्षा खूपच कमी होती. लँडिंग क्लिअरन्स मिळाल्यानंतर काही क्षणांतच विमान रनवेच्या डावीकडे ५० मीटर अंतरावर असलेल्या झाडांवर आदळले आणि त्यानंतर लागलेल्या भीषण आगीत विमान जळून खाक झाले.

# राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्याच्या समारोपीय कार्यक्रमात राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालय सन्मानित

## ✦ उत्स्फूर्त सहभागाबद्दल केंद्रीय आयुषमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत सत्कार

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलढाणा :** डॉ. भागवत वसे : आयुष मंत्रालय, भारत सरकार व अखिल भारतीय आर्युवेद महासंमेलनाच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसीय 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६' च्या समारोपीय कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल केंद्रीय आयुषमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत बुलढाणा येथील राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला.




भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते संतनगरी श्रीक्षेत्र शेगाव येथे आयुष मंत्रालय, भारत सरकार व अखिल भारतीय आर्युवेद महासंमेलनाच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसीय 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६' चा उत्साहात शुभारंभ दिनांक २५ फेब्रुवारी रोजी करण्यात आला. सदर ऐतिहासिक सोहळ्याप्रसंगी राष्ट्रपती महोदयांनी मेळाव्याबद्दल समाधान व्यक्त करून भव्य आरोग्य प्रदर्शनीच्या विविध चिकित्सा पद्धतीच्या स्टॉल्सला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासमवेत महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष तथा आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील, कामगार मंत्री आकाश फुंडकर, आ. डॉ. संजय कुटे तसेच आयोजन समितीचे सहकारी उपस्थित होते. सदर चार दिवसीय आरोग्य मेळाव्यात सर्वरोग आयुष आरोग्य शिबिरात मोफत रुग्ण तपासणी, औषधोपचार आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन तसेच शेतकरी बांधवांना औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन यासंदर्भात अमूल्य मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच अध्यापक व विदयार्थ्यांकरिता तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान तसेच शालेय विद्यार्थी व महिलांकारिता विशेष मार्गदर्शनपर सत्राचे सुद्धा यशस्वी आयोजन संपन्न झालें. आरोग्य मेळाव्याच्या अंतिम दिवशी सर्वसामान्य नागरिकांकारिता मोफत नेत्रतपासणी व चष्म्यांचे वितरण मंत्रिमंहोदय व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बुलढाणा येथील राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा. ध्रुपदराव सावळे, ॲड. कीर्तिताई सावळे - पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनात प्राचार्य, प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून राष्ट्रीय आरोग्य मेळावा यशस्वी करण्याकरिता आपले अमूल्य योगदान दिले याबाबत केंद्रीय आयुष तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राजमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या समारोपीय कार्यक्रमात महाविद्यालयाला गौरवान्वित करण्यात आले, यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हर्षद केला, प्रशासकीय अधिकारी सत्यघोष बाहेकर, उपप्राचार्य डॉ. प्रितमसिंग ठाकूर, डॉ. मोहन खोलगडे, डॉ. भागवत वसे, डॉ. तुषार देखणे, प्रसिद्धी प्रमुख दिपक पुराणे, समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर व रुग्णालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

घटना-घडामोडी



## एकमेका साह्य करू...' : सामोडे परिसरात उन्हाळी वाळवण कामांची लगबग; महिलांची पहाटेपासूनच धावपळ

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सुनील सोनवणे

**शिर्डी :** उन्हाळ्याची चाहूल लागताच सामोडे येथील दत्त नगर, राम नगर, विठ्ठल नगर आणि इंदिरा नगर या भागांमध्ये उन्हाळी वाळवणाचे पदार्थ बनवण्याच्या कामांना कमालीचा वेग आला आहे. सध्या घरोघरी नागलीचे पापड, गव्हाचे वडे, तिखट वडे आणि कुरडया बनवण्याची लगबग जोरात सुरू असून, या पारंपरिक कामांत परिसरातील महिला मोठ्या उत्साहाने मग्न असल्याचे विलोभनीय चित्र पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, या श्रमाच्या कामांसाठी महिलांनी एक अनोखा आणि कौतुकास्पद सामूहिक मार्ग अवलंबला आहे. गल्लीतील १० ते १२ महिला एकत्र येऊन आळीपाळीने एकमेकींच्या घरी जाऊन (पडजी करून) पापड आणि वडे बनवण्याचे काम करत आहेत. पहाटे ५ वाजल्यापासूनच या कामाला उत्साहात सुरुवात होते आणि दुपारचे १२ वाजेपर्यंत हसत-खेळत सर्व कामे आटोपली जातात. या साखळी पद्धतीमुळे श्रमांची विभागणी होऊन कामे जलद आणि आनंदात पार पडत आहेत. सध्या बाजारात नागलीचे भाव गगनाला भिडले आहेत. २०० रुपये प्रती चंपे असा दर असून, त्यासाठी लागणारा इतर खर्चही मोठा आहे. वाढत्या महागाईची झळ बसत असली, तरी वर्षभरासाठी आणि दैनंदिन आहारात लागणाऱ्या या पारंपरिक पदार्थांची निर्मिती महिला तितक्याच आवडीने करत आहेत. महागाईवर मात करत, "एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" या वचनाची प्रचिती सामोडे परिसरातील या महिला भगिनींच्या एकजुटीतून आणि उत्साहातून खऱ्या अर्थाने पाहायला मिळत आहे.



## धनंजय मुंडेंच्या केसाला धक्का लागला तर कार्यक्रम खल्लास:गोविंद फड यांची मनोज जरांगेंना थेट धमकी

बातमी जगत | प्रतिनिधी

**परळी :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यातील वाद आता विकोपाला गेल्याचे पाहायला मिळत आहे. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आणि परळी बाजार समितीचे माजी सभापती गोविंद फड यांनी सोशल मीडियावर एक खळबळजनक पोस्ट शेअर करत मनोज जरांगे पाटील यांना थेट धमकी दिली आहे. "धनंजय मुंडे यांच्या केसाला पण धक्का लागला, तर कार्यक्रम खल्लास... जरांगे, सुरेश धस भंडारा लावून बोलतोय," अशा आशयाची ही पोस्ट सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरली आहे. गेल्या काही महिन्यांपासून मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्यात सातत्याने शाब्दिक युद्ध सुरू आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर हा वाद सुरू झाला. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असून तो सध्या तुरुंगात आहे. या घटनेवरून जरांगे पाटील यांनी मुंडेंवर गंभीर आरोप करत सडकून टीका केली होती. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आपल्याला मारण्याचा कट रचला जात असल्याचा खळबळजनक दावा केला होता. या प्रकरणात अमोल खुणे नावाच्या तरुणाला संशयित म्हणून अटक करण्यात आली होती, जो सध्या जामिनावर बाहेर आहे. या कटामागेही राजकीय हात असल्याचा संशय जरांगे यांनी व्यक्त केला होता, ज्यामुळे परळी आणि आसपासच्या परिसरात तणाव वाढला होता. गोविंद फड यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्यासह आमदार सुरेश धस यांचाही उल्लेख केल्याचे समजते. 'धनंजय मुंडे यांच्या केसाला पण धक्का लागला तर कार्यक्रम खल्लास.. जरांगे, सुरेश धस भंडारा लावून बोलतोय' असा मजकूर या पोस्टमध्ये आहे. "भंडारा लावून बोलतोय" या शब्दांतून त्यांनी दिलेली ही चेतावणी थेट संघर्षाला आमंत्रण देणारी असल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात अद्याप गोविंद फड किंवा धनंजय मुंडे यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, मात्र सोशल मीडियावर या पोस्टमुळे आता वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# न्सालयाने राममंदिराचा प्रश्न जसा सोडवला,तसा बुद्धगयेचा प्रश्न सोडावा

✦ केंद्रीय मंत्री डॉ.रामदासजी आठवले

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलडाणा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हायातीत पहीली धम्म परिषद रंगून (जपान) येथे झाली होती त्या नंतर 70 वर्षांनी दुसरी धम्म परिषद छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विश्वशाती बुध्दविहार भीमटेकडी जटवाडा येथे 26 फेब्रुवारी ते 2 मार्च आयोजित पाचदिवसीय जागतीक धम्म परिषदेच्या दुसऱ्या दिवसीय सत्राचे उद्घाटन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार तथा राष्ट्रीयध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाचे डॉ.रामदासजी आठवले होते सर्व प्रथम महाकरूणीक भगवान गौतम बुद्धांच्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दिपधुप पुष्पाने पुजन करूण दुसऱ्या सत्राचे उद्घाटन केले.

उद्घाटन प्रसंगी डॉ.रामदास आठवले म्हणाले की, बुध्दगयेचे महाबोधी विहार आमच्या ताब्यात असले पाहिजे. ते मिळणारच आहे. हा प्रश्न राममंदिर व बाबरी मशिदी सारखा गंभीर नाही. न्यायालयाने राममंदिराचा प्रश्न जसा सोडवला तर तसा बुध्दगयेचा प्रश्न देखील न्यायालयाने सोडवावयास पाहिजे व त्या ट्रस्ट मध्ये सर्व सदस्य बौध्द असले पाहिजे असी आमची मागणी केंद्रीय सामाजीक न्याय राज्यमंत्री भारत सरकार तथा रिपाई राष्ट्रीयध्यक्ष डॉ. रामदासजी आठवले यांनी 27 फेब्रुवारी रोजी उद्घाटन प्रसंगी उपस्थित करून मागणी केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्यान्मारचे भिक्खु आसिन रमतारा सयाडो होते, भदंत उपगुप्त महाथेरो पुर्णा हे स्वागतध्यक्ष होते.तर प्रमुख जालणा लोकसभेचे लोकप्रिय खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यासह भदन्त करूणाबोधी महाथेरो संकेशा, हर्षबोधी बुध्दगया,यांच्यासह देश-विदेशातील 200 हून अधिक भिक्कूसंख,भिक्खुणी संघाची उपस्थिती होती. डॉ. रामदासजी आठवले म्हणाले की, बुध्द ह्याचा प्रश्न आम्हाला संपवावयाचा आहे. हा एव्हढा प्रश्न गंभीर नाही. बुध्दगयेच्या महाविहार ट्रस्टीमध्ये चार सदस्य आहेत त्याऐवजी आठ सदस्य करावे व आमचाच बौद्ध अध्यक्ष असावा. त्यासाठी कायदा बदलणे आवश्यक आहे.1949 पासून हा कायदा आहे. आतापर्यंत सर्व पक्षांची सरकारे येऊन गेली, पण त्यांनी कायदा बदलला पाहिजे होतो तो का नाही बदलला नाही ? मी नरेंद्र मोदींच्या सरकारमध्ये असलो तरी मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचाच शिष्य असून बौध्द आहे. मी नरेंद्रजी मोदींन कडे सामाजिक धार्मिक प्रश्न मांडतच असतो.मी नरेंद्र मोदी यांच्या मुळ गावी वडनेर येथे बुध्दकाळातील मोठे बौद्ध प्रशिक्षण केंद्र होते, या केंद्राला चिनी प्रवासी ह्युयंगत्संग येऊन गेले तेथे पंतप्रधान मोदी यांनी चिनच्या राष्ट्राध्यक्षांना आणले होते. आयोजीका आर्याजी भिक्खुनी प्रा.धम्मदर्शना महाथेरो यांच्या विविध विकास कामासाठी त्यांच्या संस्थेला 50 एकर जागा देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. तसेच या परिषदेसाठी मी माझ्या या महीण्याच्या दोन लाख रूपयातून मी माझ्यासाठी एक लाख ठेवतो व एक लाख धम्मपरिषदेला देतो, तसेच माझ्या खासदार निधीतून 75 लाखांची मदत टप्याटप्याने देण्याची घोषणा केली. प्रमुख उपस्थितीत असलेले प्रमुख पाहुणे जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ही परिषदेला 25 लाखांचा स्वच्छा दिली देण्याची घोषणा करून शुभेच्छा दिल्या देत मी तूमच्या पाठीशी तमन्नाने उभा आहे. संयोजीका भिक्खूणी प्रा. धम्मदर्शना यांनी प्रस्तावित केले. मंचकावर रिपाई प्रदेशकार्यध्यक्ष बाबूराव कदम, मराठवाडाध्यक्ष मिलींद शेळके, मराठवाडा उपाध्यक्ष प्रा.दिलीप पाडमुख, कार्यकारी सदस्य किशोर थोरात,दौलतदादा खरात, रिपाइं जिल्हा संपर्क प्रमुख बुलडाणा पत्रकार बाबासाहेब जाधव, जिल्हाध्यक्ष विजय मगरे,बाळकृष्ण इंगळे,युवाध्यक्ष राकेश पंडीत, पत्रकार गणेशदादा सुरडकर, शेतकरी संघटनेचे कृष्णा साबळे व सर्व समिती सदस्य यांची उपस्थिती होती.दुसऱ्यादिवसी उपासकांची लक्षणीय प्रचंड गर्दी जागतीक धम्म परिषदेला पहिल्या दिवसी 27 फेब्रुवारी शुक्रवारी उपासक-उपासिकांनी सभामंडप रेकॉर्डब्रेकगर्दी केली होती.याठिकाणी विविध देशातून आलेल्या भिक्खू-भिक्खूनींणी धम्मदेसना पहील्या दिवस 26 फेब्रुवारी पासून देत 2 मार्च पर्यंत आहे. असा नियोजनबध्द कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिलकुमार बस्ते,डॉ. अरविंद गायकवाड यांनी केले.

## 6 व्या मजल्यावरून 6 कामगार कोसळले

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्याची राजधानी असलेल्या मुंबईतील चेंबूर परिसरात एक भयंकर घटना घडली आहे. चेंबूरच्या सुभाष नगर भागातील एका निर्माणाधीन इमारतीच्या 6 व्या मजल्यावरून 6 कामगार कोसळलेत. या घटनेत एका कामगाराचा मूत्यू झाला असून, 5 जण जबर जखमी झालेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सुभाष नगर येथील एका आलिशान इमारतीचे वेगात बांधकाम सुरू आहे. शनिवारी दुपारी 12.05 च्या सुमारास या ठिकाणी कामगार नेहमीप्रमाणे काम करत होते. ते इमारतीच्या 6 व्या मजल्यावर बांधकाम करत होते. यावेळी 6 कामगार अचानक तोल जावून 80 ते 90 फूट उंचीवरून खाली कोसळले. या घटनेत 6 कामगार जबर जखमी झाले. त्यातील एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच बांधकामस्थळी असणारे इतर कामगार व स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले.

## वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी शाळांचा पुढाकार महत्त्वाचा : दत्तराव पोफळे

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान



**मालेगांव :** येथील बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत व्हावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून दत्तराव पोफळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात विठ्ठल भिसडे यांनी भारतीय शास्त्रज्ञांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड जोपासण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी दत्तराव पोफळे यांनी आधुनिक विज्ञानाचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जोपासावी, असे प्रतिपादन केले.यानंतर विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे परीक्षण केशव इंगळे यांनी केले. या स्पर्धेत ए पी जे अब्दुल कलाम गटाने (इयत्ता पाचवी, सहावी व सातवी) प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी कोमल कांबळे व वैष्णवी धोंगडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे व गणेश इढोळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश इढोळे यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## पेणमध्ये लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर



**पेण :** जय महाराष्ट्र शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना तालुका पेण शाखा, पंचायत समिती पेण यांच्या वतीने लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेने २३ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत संपूर्ण महाराष्ट्रभर शासनाच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या चौथा वेतन आयोगापासूनच्या वेतनत्रुटी दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करणे, पदनामात बदल करणे आणि पदोन्नतीची साखळी कमी करणे यांचा समावेश आहे. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना जशास तसे जुनी पेन्शन योजना लागू करावी, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा प्रतीक्षा यादीतील सर्वांना जुनी पेन्शन लागू करावी, आणि जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मृद व जलसंधारण विभागात समावेशन करू नये, अशा ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत. शासनाला वारंवार निवेदने देऊन आणि विविध आंदोलन करूनही कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने हा तीव्र निर्णय घेतल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

## राजश्री प्राथमिक शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

बातमी जगत | प्रतिनिधी



**मेहकर :** स्थानिक ध.दि. रहाटे शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेद्वारा संचालित राजश्री प्राथमिक शाळेत दि 28 फेब्रुवारी ला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा झाला

ह्यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती व परीक्षक म्हणून श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महिला महाविद्यालयाच्या डॉ.सविता पवार, डॉ.वैशाली मोरे अंधारे, डॉ संगीता खडसे ह्या उपस्थित होत्या ह्यावेळी इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी एकूण 80 विज्ञानाशी निगडित मॉडेल बनवले होते, ह्यात जलशुद्धीकरण, सौरमंडळ, सेंद्रिय शेती, ज्वालामुखी, चंद्रयान, मिसाईल, सोलर कुलर अशा विविध विषयावर विद्यार्थ्यांनी मॉडेल द्वारे आपले प्रदर्शन केले, विद्यार्थ्यांना अशा मॉडेल द्वारे आणखी काही वेगळे शिकायला मिळते भावना परीक्षक ह्यांनी व्यक्त केली.ह्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अजिंक्य बार्डेकर, शिक्षक विजय फंगाळ, सिद्धार्थ जाधव, विकास भोसले, रामेश्वर इंगळे, सचिन राठोड, शिक्षिका मनीषा वानखेडे, संध्या ठोकरे, ज्योती बिलघे उपस्थित होत्या

# विदर्भ पब्लिक स्कूल मध्ये मराठी भाषा गौरव दिन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान




**मालेगांव :** कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी विदर्भ पब्लिक स्कूल मालेगाव येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यार्थिनी कार्तिकी घुगे हिने दिनाचे महत्त्व व कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची थोरवी सांगणाऱ्या गीतावर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यानंतर विद्यार्थ्यांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चरित्र आणि आत्मचरित्र अशा विविध साहित्यप्रकारांची माहिती सादर करून मराठी भाषेची समृद्ध परंपरा अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विद्या काळे यांनी दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वाढता लोप याबाबत चिंता व्यक्त करत विद्यार्थ्यांना मराठीचा अभिमान बाळगून तिचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल तसेच सहभागी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल मुख्याध्यापिका सौ. विद्या काळे यांनी विशेष कौतुक केले. मराठी भाषेचा गौरव आणि संस्कृतीची जपणूक करण्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना-घडामोडी



## कोमसाप वसई शाखा आणि विद्यावर्धिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "साद मराठी" कार्यक्रम संपन्न!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**वसई :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद, वसई शाखा आणि लिटराती समिती, विद्यावर्धिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, वसई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "साद मराठी" कार्यक्रम मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला गुरुवार दिनांक: २६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार सभागृहात संपन्न झाला. कोकण मराठी साहित्य परिषदेचे वसई शाखेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, कार्यवाह शिल्पा परुळेकर,विद्यावर्धिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राकेश हिमते, संस्थेचे संचालक प्रतापभाई शाह, संचालक छगन नाईक,साहित्य जल्लोषचे सचिव संदेश जाधव, लिटरेती समितीच्या मुख्य डॉ.स्वाती वर्मा,प्रा.डॉ. गुप्ता या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . या कार्यक्रमात श्रोत्यांना कविता, गाणी, नृत्य, अभिवाचन आणि हास्य नाटिका यांची मनोरंजक मेजवानी मिळाली. महाविद्यालयातील विध्यार्थी आणि कोमसाप, वसई शाखेचे सदस्य यांनी आपल्या सादरीकरणातून श्रोत्यांची मने जिंकली. त्याचप्रमाणे कोमसाप, वसई शाखा आयोजित जिल्हास्तरीय कथालेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ देखील यावेळी संपन्न झाला. स्पर्धेच्या परीक्षक डॉ. सुनीता सुनील चव्हाण यांनी कथालेखन स्पर्धेविषयी आपले मनोगत व्यक्त करून निकाल जाहीर केला. कार्यक्रमात कोमसाप वसई शाखेच्या माजी अध्यक्षा संगीता अरबूने, सदस्या सुषमा राऊत, ज्योती राव, रंजना ठाकूर, सदस्य वीरेंद्र पाटील, विशाखा गाळवणकर, यांनी सहभागी होऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली. महाविदयालयाच्या विद्यार्थ्यांसोबत हार्मोनियम विषारद प्रा. योगेश पिंगळे यांनीदेखील सहभागी होऊन कार्यक्रमाची मनोरंजकता वाढवली. इतर मान्यवरात डिंपल पब्लिकेशचे अशोक मुळे, साहित्य जल्लोषचे सहसचिव जयंत देसले, कोमसापचे खजिनदार-पत्रकार विजय खेतले,सदस्या पद्मजा पाटील, नगरसेविका पुष्पा जाधव, पत्रकार संदीप पंडित, आशिष राणे, डॉ. प्रदीप जाधव, वीणा चाफेकर यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. अशाप्रकारे नृत्य, संगीत आणि नाट्याविष्कारांनी सजलेली एक संस्मरणीय संध्याकाळ उपस्थितांनी अनुभवली.

## भंडारा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर धडकला शेतकऱ्यांचा जनसागर

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील धान खरेदीच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांचा संताप आता अनावर झाला आहे. धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवणे, रखडलेले चुकारे आणि बोनसच्या मागणीसाठी भारतीय किसान संघाच्या नेतृत्वात काल, २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाने प्रशासनाचे धाबे दणाणले असून, शेतकऱ्यांनी सरकारला ८ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या मोर्चाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ शेतकरीच नव्हे, तर अडचणीत सापडलेले धान खरेदी केंद्र चालकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खासदार डॉ. प्रशांत पडोले यांनीही या मोर्चात प्रत्यक्ष सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांना आपला जाहीर पाठिंबा दर्शविला. "शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही," असा सूर यावेळी उमटला.

## पान एक वरून

बॉलिवूडचे प्रसिद्ध विनोदी अभिनेते राजपाल यादव यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत एक मोठा दावा केला आहे. अभिनेत्याने सांगितले आहे की, त्यांच्याकडे भविष्यात ₹1200 कोटींचे काम आणि 10 चित्रपटांचे प्रकल्प आहेत. तरीही, एका जुन्या चेक बाऊन्स प्रकरणामुळे त्यांना कायदेशीर अडचणी आणि तुरुंगासारख्या परिस्थितीत आणून उभे केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, तक्रारदाराने त्यांच्याकडून सादर केलेले मालमत्तेचे कागदपत्रे आणि सुरक्षा रक्कम न्यायालयात स्वीकारली नाही आणि त्याला फक्त राजपाल तुरुंगात जावे असे वाटत होते. राजपाल यादव यांनी २०१० साली त्यांचा चित्रपट 'अता पता लापता' निर्मिती करण्यासाठी एका कंपनीकडून सुमारे ₹५ कोटी घेतले होते. या रकमेवर व्याज लावण्यात आले, ज्यामुळे परतफेड करण्याची रक्कम १०.४० कोटी रुपये झाली होती. दिग्दर्शक म्हणून हा त्यांचा पहिलाच प्रकल्प होता, पण चित्रपट बॉक्स ऑफिसवर अयशस्वी ठरला आणि राजपाल यांना पैसे भरणे कठीण झाले. त्यानंतर त्यांनी अनेक पोस्ट-डेटेड चेक दिले, जे बँकेत बाउंस झाले. यामुळे तक्रारदाराने चेक बाउंस अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि प्रकरण कोर्टात पोहोचले. राजपाल यादव यांचे वकील भास्कर उपाध्याय यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आरोप करणाऱ्याने आधी सांगितले होते की, ते सिक्युरिटी मनी आणि प्रॉपर्टी पेपर्स स्वीकारतील आणि प्रकरण मिटेल. पण जेव्हा कागदपत्रे सादर करण्यात आली, तेव्हा त्यांनी ती घेण्यास नकार दिला आणि फक्त राजपालला तुरुंगात पाठवण्यावर भर दिला.

# माझ्या जीवंत पणी न्याय द्याहो ! मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री कडे कर्करोग्याचा टाहो!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ विजय गोलेछा**

**लोणार :** माझ्या जीवंत पणी न्याय द्याहो!असा अर्ज मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री कडे सादर करुन लोणार येथील कर्करोगी कांतिलाल सुवालाल जोगड यांनी टाहो फोडला आहे. या बाबत तक्रार कर्त्याच्या अर्जा नुसार हकिकत अशी की, लोणार येथील नगर भुमापन क्रमांक ३३४ आणि ३३५ यांचा नझुल सर्वे करतांना शासकीय कर्मचारी यांच्या कडुन चुक झाली ३३४ चे काही क्षेत्र ३३५ मध्ये दाखविले गेले दोन्ही शेजा-यांच्या लक्ष्यात ही बाब आल्यानंतर दोघांनी म्हणजे कांतिलाल सुवालाल जोगड



आणि मंगलचंद आदीनाथ संगवई यांनी सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी क्षेत्र दुरुस्ती चे अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १०६ नुसार जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा यांच्या कडे सन् २०१५ मध्ये दाखल केले. सदर अपिल प्रकरण जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा यांच्या कडुन जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख बुलडाणा यांच्या मार्फत सत्यता पडताळणी साठी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लोणार येथे पाठविण्यात आले. उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लोणार यांनी दोन्ही अर्जदार यांना मालमत्तेची शासकीय मोजनी करुन घेण्यासाठी च्या सुचना देऊन आवश्यक शुल्क भरण्यास लाऊन शासकीय मोजनी करुन घेतली. स्थळ निरिक्षण पंचनामा सह अर्जदार यांचे कायदेशीर लागणारे जवाब ही नोंदवून घेतले आणि आपले अपील प्रकरण अंतिम निर्णय साठी जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे परत पाठविण्यात येईल असे सांगितले अर्जदार यांनी उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लोणार आणि जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे अनेक चक्कर लगावले परंतु सदर प्रकरण जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे पाठविलेच गेले नसल्याने न्याय मिळाला नाही तर उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लोणार येथे बदलुन आलेल्या संबंधित विभागाचे कर्मचारी यांनी बदली होऊन गेलेल्या कर्मचारी यांनी त्यांच्या रेकार्ड हस्तांतरण यादी मध्ये आपले प्रकरणच हस्तांतरण केलेले नाही असे सांगितल्याने अर्जदार यांना मोठी शंका उपस्थित झाली आणि माझ्या जीवंत पणी न्याय मिळण्याबाबत शाशंक असल्याचे त्यांनी त्यांचे नातेवाईक कांतिलाल मुथा यांच्या ही जागेच्या क्षेत्र दुरुस्ती अपिल जे जिलाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे सन् २०१० मध्ये सर्व पुराव्यानिशी दाखल केले होते आणि नंतर शासकीय मोजनी सह प्रकरण निकाला विना कार्यालयात पडुन असतांना कांतिलाल मुथा यांच्या जीवंत पणी त्यांना न्याय मिळाला नाही दरम्यान त्यांचे दिनांक २३ एप्रिल २०२१ रोजी निधन झाले नंतर ही त्यांच्या पत्नी आणि वारसांना अध्याप पावेतो न्याय मिळाला नाही या मुळे कर्करोगाने ग्रासलेल्या अर्जदार कांतिलाल सुवालाल जोगड यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसुल मंत्री, पालक मंत्री, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव,आमदार सिध्दार्थ खरात सह महसूस आणि भूमि अभिलेख च्या सर्व संबंधितांना आपल्या अर्जाच्या प्रति स्पिड पोस्ट व्दारा पाठविल्या असुन न्यायेची मागणी केली आहे. या गंभीर प्रश्नी अर्जदारासह सर्व अपिलकर्त्यांना केव्हा न्याय मिळेल आणि शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही होते या कडे जनता जनार्दन चे लक्ष्य वेधले आहे.

## ग्रामरोजगार सहाय्यकांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासन दरबारी पाठपुरावा करणार - आ.संजय गायकवाड

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ विष्णु आखरे पाटील**

**बुलडाणा :** ग्रामरोजगार सहाय्यक कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाला आमदार संजय गायकवाड यांच्या मध्यस्थीने स्थगिती देण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून वेतनवाढ, सेवा अटींचे नियमितीकरण, मानधनातील तफावत दूर करणे आदी मागण्यांसाठी आंदोलन सुरू होते. या पार्श्वभूमीवर आमदार संजय गायकवाड यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी



सविस्तर चर्चा केली. संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांकडून मागण्यांचे निवेदन स्वीकारले असून संबंधित प्रश्नांबाबत शासन स्तरावर तातडीने पाठपुरावा करून सकारात्मक निर्णय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

चर्चेनंतर ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत बळीराम देशमुख यांना शरबत देऊन आमदार संजय गायकवाड व जिल्हा परिषदेचे अधिकारी यांच्या हस्ते उपोषणाची सांगता करण्यात आली. ग्रामरोजगार सहाय्यकांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून लवकर निर्णय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. संवाद आणि समन्वयाच्या माध्यमातून प्रश्न सोडवणे हाच लोकप्रतिनिधी म्हणून प्रयत्न राहील असे मत आमदार संजय गायकवाड यांनी व्यक्त केले. या प्रसंगी संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामरोजगार सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जयंत पाटलांचा सरकारला उपरोधिक टोला

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी आज सभागृहात एआयच्या मुद्यावर बोलताना सरकारला उपरोधिक टोला हाणला. मंदिर की मस्जिद, भगवा की हिरवा, हलाल की झटका हे विषय घेणाऱ्या लोकांनी आज एआय सारखा नवा विषय सभागृहात मांडला ही कौतुकास्पद बाब आहे, असे ते म्हणाले. यावेळी ते दुसरे काहीही नको, फक्त तुमचे बिबटे आवरा, असेही म्हणाले.

विधानसभेत आज एआयच्या मुद्यावर नियम 293 अन्वये चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना जयंत पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री गणेश नाईक यांनी बैठक घेऊन हे अधिवेशन पूर्ण होण्याअगोदर बिबट्याचे काय करणार? हे सांगावे. आम्हाला तुमच्याकडून बाकी काहीच नको, फक्त बिबट्याचे काय करणार सांगा? तुमचे बिबटे आवरा एवढीच मागणी जनता करत आहे? तुमचे म्हणजे सरकारचे नाही, तर जे जंगलातून बाहेर पडलेत ते. वन विभागाला या प्रकरणी काहीच करत येत नाही. कारण, पिंजरा लावण्यासाठी प्रथम बिबट्याने माणसावर हल्ला करणे बंधनकारक आहे. माणसावर हल्ला झाला की, ते पिंजरा पाठवतात. त्यामुळे सरकारने वन विभागाला बिबट्यांना पकडण्यासाठी सगळीकडे पिंजरे लावण्याचे आदेश द्यावेत. त्यांना पकडून जंगलात नेऊन सोडावेत.

## शहापूर तालुक्यातील शिक्षकाची मुलगी देशात प्रथम...

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ वसंत पानसरे**

**ठाणे :** जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील दुर्गम भाग समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शिदवाडी शाळेत कार्यरत असणारे शिक्षक अमोल बुधवंत यांची मुलगी अनुराधा अमोल बुधवंत हिने अखिल भारतीय सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत भारतात अव्वल स्थान मिळवत महाराष्ट्राचा झेंडा राष्ट्रीय पातळीवर फडकवला आहे या ऐतिहासिक यशामुळे ठाणे, नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचा अभिमान वाढला आहे. या परीक्षेसाठी देशभरातील सुमारे



१ लाख ३४ हजार विद्यार्थी बसले होते.सदर परीक्षेचा निकाल शुक्रवारी संकेत स्थळावर लावण्यात आला.३०० गुणांच्या परीक्षेत अनुराधाने तब्बल २९६ गुण मिळवले, तर तिच्या जुळ्या भावाने, अनिरुद्ध बुधवंत याने २८६ गुण मिळवत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अनुराधा आणि अनिरुद्ध यांचे वडील अमोल बुधवंत हे ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील शिदवाडी शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असून, आई महसूल विभागात नोकरी करते. साध्या ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या या दोन्ही भावंडांनी आपल्या जिद्दीने राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. या यशानंतर अनुराधा आणि अनिरुद्ध यांनी भविष्यात भारतीय संरक्षण दलात अधिकारी बनून देशसेवा करण्याचे स्वप्न व्यक्त केले आहे.

## किन्हवलीत रंगले विद्यार्थी व साहित्यिकांचे कवीसंमेलन...

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ वसंत पानसरे**

**ठाणे :** कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांची ११४ वी जयंती म्हणजेच मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत किन्हवलीतील आदर्श विद्यामंदिर या मराठी शाळेत विद्यार्थी व नामांकित साहित्यिकांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. तीन तास चाललेल्या या साहित्यिक सोहळ्यात चौथी ते आठवीपर्यंत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निवडक १० कवितांचे सादरीकरण करण्यात आले. निमंत्रित कवी डॉ.विलास वेखंडे, डॉ. गंगाराम ढमके, विजय धानके व संतोष दवणे यांच्या दर्जेदार कवितांनी उपस्थित



साडेचारशे विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कोकण मराठी साहित्य परिषद व आदर्श विद्यामंदिर किन्हवली यांच्या संयुक्त विद्यमाने या कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.आदर्शच्या मुख्याध्यापिका व कोमसापच्या कार्यकारिणी सदस्या सुजाता धानके यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. याप्रसंगी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या २१ विद्यार्थ्यांना मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते गौरवण्यात आले. कवी संतोष दवणे यांनी या सोहळ्याचे सूत्रसंचालन केले.निलम चौधरी, निशा फुलपगार, ज्ञानेश्वर कापटे, राजेश हरड, हेमंत बाऊस्कर, सीमा हरड व सर्व शिक्षकांनी या दिमाखदार साहित्यिक सोहळ्याचे नियोजन केले होते.

# बावन बुरजी बचाव कृती समितीच्या शहर अध्यक्षपदी इंगळे

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ गणेश निकम**

**बुलडाणा :** करवंड येथील ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कार्यरत असलेल्या बावन बुरजी बचाव कृती समितीच्या बुलढाणा शहर अध्यक्षपदी अमोल संपतराव इंगळे देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे समितीच्या कामाला नवचैतन्य मिळेल, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. करवंडचा इतिहास हा मराठा साम्राज्याच्या गौरवशाली परंपरेशी निगडित



आहे. १५ एप्रिल २०२६ रोजी समितीच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर भव्य करवंड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ही तारीख ऐतिहासिक महत्त्वाची आहे.याच दिवशी करवंड येथील सेनापती शिवाजीराव इंगळे यांच्या कन्या गुणवंताबाई यांचा विवाह छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी रायगड किल्ला येथे संपन्न झाला होता. त्यामुळे या दिवशी साजरा होणारा करवंड महोत्सव हा शिवाजी महाराज व गुणवंताबाई इंगळे यांच्या विवाहदिनाचे ऐतिहासिक स्मरण म्हणून विशेष महत्त्वाचा आहे.

बुलढाणा हे जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने येथील संघटनात्मक कामाला विशेष महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर अमोल देशमुख यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांचा व्यापक जनसंपर्क, सामाजिक कार्यातील सातत्य आणि नेतृत्वगुण लक्षात घेता ते ही जबाबदारी समर्थपणे पार पाडतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.अमोल इंगळे देशमुख हे विविध सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक संस्थांमध्ये सक्रिय आहेत. ते परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे उपाध्यक्ष असून आभाळगाव बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. ग्रामीण विकास, युवक संघटन आणि सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत.करवंड महोत्सवाच्या निमित्ताने १५ एप्रिल रोजी बुलढाणा ते करवंड अशी भव्य मोटरसायकल रॅली आयोजित करण्याचा त्यांचा मानस आहे.

त्यांच्या निवडीबद्दल सुनील जवंजाळ पाटील,हरी रुद्रराजे इंगळे, विद्याधर महाले, अरविंदराव देशमुख, अण्णासाहेब मळसणे, ॲड. ए. टी. नाना देशमुख यांसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## थोडक्यात



### मनातल्या व्यथा जगाला कवितेतून कळाव्यात-- साहित्यिक रज्जाक शेख

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ बाळासाहेब दुधाळे

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अंतर्गत एस टी काव्य रसिक समूहाचे सातवा काव्योत्सव कर्मवीर भाऊराव पाटील सभागृह नाशिक येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. यावेळी कवितेतून मनोरंजन किंवा काल्पनिक आनंद होण्यापेक्षा कर्मचाऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या व्यथा जगाला कवितेतून कळाव्यात असे मत कार्यक्रमाचे उद्घाटक जेष्ट साहित्यिक गझलकार रज्जाक शेख यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर सातव्या काव्यसोहळ्याचे अध्यक्ष नाशिक परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर, समूहाचे प्रशासक राकेशकुमार शिवदे,महिला अधिकारी मंगल उदामले,नाशिक येथील डी एस ओ वाघ,कराड आगारप्रमुख, शर्मिष्ठा पोळ,उमरखेड आगारप्रमुख प्रमोदिनी किंनाके,वसमत आगारप्रमुख आबा पांचाळ आणि आयोजक महेश देशमुख उपस्थित होते. विभागीय नियंत्रक यांच्या शुभहस्ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. परिवहन महामंडळ अंतर्गत येणाऱ्या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे सन्मान समूहाच्या वतीने करण्यात आले.कवीच्या स्व:लिखित कविता आणि कराओके गाण्यांचे सादरीकरण एकापेक्षा एक सुंदर झाले. यावेळी अध्यक्ष सचिन क्षीरसागर यांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याची घोषणा केली. समूहाचे प्रशासक राकेश शिवदे यांनी समूहाची भूमिका स्पष्ट केली आणि वरिष्ठ पातळीवर संमेलन घेण्यासाठी योग्य पद्धतीने प्रयत्न सुरू केले जात आहे असे आश्वासन सभासदांना दिले.यावेळी गझलकार रज्जाक शेख यांच्या गझल गायकीला भरघोस प्रतिसाद मिळाला. शिवपोवाडा सादर करून वातावरणात नवचेतना निर्माण केली. त्यांनी कष्टकरी शेतकरी , कामगार बापाच्या व्यथा आपल्या कवितेतून मायबाप सरकारपर्यंत पोहोचाव्यात ही अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे साहित्यिक राहुल रतन इंगोले,जयश्री मतकर,महादेव ढोणे,राजू पाटील,आर.एन. कांबळे,प्रमोदिनी किनाके,भास्कर गिते,बद्रीनाथ भालगडे,सरिता पाटील,माघाडे साहेब मिलिंदकुमार सोनाळे,दादा खरे,डी.डी. रोकडे,गजानन बोणे,हणमंत लोंढे महाराज,सुरेश बिले,संगम स्वामी,कपिल गोंधळे,श्रीमंगले देवराव,शिल्पा काकडे,रत्नमाला गोरे,वृषाली मगरे,के.पी. बिराजदार,अनिता पवार,उदयभान पवार,मनीषा कुलकर्णी,दीपक पांढरे,रमेश हटकर,रविंद्र सोनाळे आदी राज्यभरातून उपस्थित असलेल्या मान्यवरांनी आपल्या रचना सादर केल्या.उपस्थित सर्वांना सन्मानपत्र,सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महामंडळातील कलावंत आणि चमकते हिरे यांना हेरून प्रशासक राकेश शिवदे यांनी एकत्र आणले आणि सातवे संमेलन आयोजित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव ढोणे , सरिता पाटील यांनी तर आभार आयोजक महेश देशमुख यांनी मानले.

### FDA मधील भ्रष्टाचाराचे 'रॅकेट' मुख्यमंत्र्यांच्या रडारवर:वादग्रस्त अधिकारी उल्हास इंगोले यांच्या चौकशीची मागणी; आमदार आक्रमक

बातमी जगत | प्रतिनिधी

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागात मागील काही काळापासून सुरू असलेल्या लाचखोरीच्या सत्रानंतर आता या विभागातील 'भ्रष्ट वर्तुळाचा' पर्दाफाश झाला आहे. विभागातील मुख्यालय सहआयुक्त (अन्न) उल्हास इंगोले यांच्या विरोधात तक्रारींचा पाऊस पडला असून, हे प्रकरण आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारी पोहोचले आहे. सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांना पाठबळ दिल्याचा आणि एकाच पदावर वर्षानुवर्षे ठाण मांडून बसल्याचा गंभीर आरोप या अधिकाऱ्यावर करण्यात आला आहे. तक्रारदार सूरज केराप्पा पडवळकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात इंगोले यांच्या कार्यपद्धतीवर आणि त्यांच्याकडे असलेल्या अवाढव्य संपत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. निवेदनातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत: मुख्यालय सहआयुक्त (अन्न) या पदाचा अतिरिक्त कार्यभार इंगोले यांनी अनेक वर्षांपासून नियबाह्य पद्धतीने स्वतःकडेच ठेवला आहे. भाजपा आमदार श्वेता महाले आणि राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी सभागृहात या अधिकाऱ्याच्या विरोधात आवाज उठवला होता. मिटकरी यांनी तर इंगोले यांचा प्रतिबंधित गुटखा विक्रीत सहभाग असल्याचा थेट आरोप विधान परिषदेत केला होता. महाराष्ट्र पोलिसांना नमुने चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यास प्रतिबंध करणारा आदेश इंगोले यांनी कोणत्या अधिकारात काढला, याची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दक्षता सहआयुक्तांकडून चौकशी होऊनही त्याचा अहवाल अद्याप का सादर झाला नाही, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. काही दिवसांपूर्वीच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडल्यानंतर त्याला तातडीने सेवेतून मुक्त करण्यात आले आहे. याच धर्तीवर एफडीएतील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाला पेण तालुक्यात प्रारंभ; महसूल विभागाच्या थेट सेवा जनतेच्या दारी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर




**पेण :** हिंदवी स्वराज्याची संकल्पना आणि लोककल्याणाचा ध्यास घेणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत ‘छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर’ अभियान राबविण्यात येत आहे. राज्याचे महसूल मंत्री यांच्या संकल्पनेतून पुढील तीन महिन्यांत तालुका व मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व महिलांना विविध महसूल सेवा थेट त्यांच्या गावात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत अशी माहिती घेतलेल्या पत्रकार परिषदेत पेण तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी दिली.

या अभियानांतर्गत ७ मार्च, १४ मार्च, एप्रिलमधील १० व १७ तारीख तसेच ८ मे आणि १५ मे अशा सहा विशेष अभियान दिवसांचे आयोजन करण्यात येणार आहे. मंडळ, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रात शिबिरे भरवून प्रलंबित महसूल प्रकरणांचा निपटारा, दाखले वितरण व जनजागृती केली जाणार आहे. १८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत पूर्वतयारी पूर्ण करून ७ मार्च ते १५ मे दरम्यान शहरी व ग्रामीण भागात प्रत्यक्ष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी ४ मार्च २०२६ रोजी पंचायत समिती पेण येथे सरपंच परिषद आयोजित करून ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व इतर विभागीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

या शिबिरात महसूल विभागाच्या १५ प्रमुख सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामध्ये १) प्रलंबित फेरफार निकाली काढणे, २)७/१२ मधील चुका दुरुस्ती, ३)डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ उतारे, ४) ८ अ चे वाटप , ५) उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, ६) नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, ७) अकृषिक तरतुदींवरील मार्गदर्शन (कलम ४२-४७), ८) सामाजिक अर्थसहाय्य योजना मंजुरी, ९) विद्यार्थ्यांना दाखले वाटप, १०) तुकडेबंदी कायदा सुधारणा, ११)पाणंद रस्ता, घरपट्टे वाटप, १२) घरे पट्टे वाटप, १३) Agristack नोंदणी, १४) PM Kisan योजना, १५)कमी-जास्त पत्रक दप्तर अद्ययावत करणे, वारस तपास नोंदी आदी सेवांचा समावेश आहे.

तसेच भूमी अभिलेख विभागाकडून १)डिजिटल सेवा प्रसार, २)गावठाण भूमापन, ३)स्वामित्व अंतर्गत फेरफार, ४)महाभूमी पोर्टल जनजागृती , ५)तुकडेबंदी कायद्यामधील माहिती आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

महसूल विभाग हा नागरिकांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत विविध शासकीय कामकाजाशी निगडित असल्याने त्याची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे मर्यादित कालावधीत सेवा पुरविताना अडचणी येतात; त्या लक्षात घेऊन हे शिबीर अभियान राबविण्यात येत आहे. शासन निर्णयांचा प्रसार, जनतेशी थेट संवाद व प्रलंबित कामांचा निपटारा हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पेण तहसीलदार तानाजी शेजाळ घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले आहे.

## झोडगा धरणाच्या कॅनॉल च्या पाण्यासाठी शिवसेनेचा इशारा - निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ उल्हास ठाकरे



**कारंजा :** कारंजा तालुक्यातील झोडगा धरणाच्या पाण्याचा लाभ भुलोडा, ब्राह्मणवाडा, औरंगपूर व कामरगाव येथील शेतकऱ्यांना तात्काळ मिळावा, या मागणीसाठी शिवसेना तालुका प्रमुख मंगेश पाटील मुदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सन २००८-०९ मध्ये बांधण्यात आलेल्या झोडगा धरण प्रकल्पाला अनेक वर्षे उलटूनही कालव्याचे काम अपूर्ण असल्यामुळे शेतकरी जलसिंचनापासून वंचित आहेत. शासनाने कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही प्रत्यक्ष फायदा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. यासंदर्भात संबंधित विभागाला निवेदन देण्यात आले असून सोबतच माननीय आमदार भावनाताई गवळी यांना पण निवेदन देण्यात आले असून तात्काळ काम सुरू करून पूर्ण करण्याचा ठोस निर्णय न घेतल्यास शिवसेना शैलीत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. नोव्हेंबर 2026 पर्यंत संबंधित विभागातून काम पूर्ण करण्याच्या आश्वासन देण्यात आले. सदर मागणीमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यावेळी क्षमानंद निमगडे , प्रशांत भाऊ लाकडे, मंगेश मसनकार, शहर संघटक ऍड संदेश जिंतूरकर, मा.पंचायत समिती सदस्य रवी भाऊ भुते, वैद्यकीय प्रमुख शुभम भोयर व शेतकरी बांधव उपस्थित होते

## आरेगाव रस्त्याचा 'वनवास' कधी संपणार?

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ संदीप पळसकर





**डोणगाव :** एकेकाळी गावाची शान असलेला आरेगाव रस्ता आज ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरला आहे. गेल्या ३ वर्षांपासून हा रस्ता खोदून ठेवल्याने रस्त्यावर धुळीचे प्रचंड साम्राज्य पसरले आहे. या धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढत असून व्यापाऱ्यांचे धंदेही ठप्प झाले आहेत. काही व्यवसायिकांनी धूळ उडू नये म्हणून रस्त्या वर पाणी मारण्यात येते सरकारकडे पैसा नाही की प्रशासन आणि ठेकेदाराच्या 'मिलीभगत'मुळे रस्त्याचा निधी हडप केला गेला?

शासकीय कर्मचारी पगार तर जनतेच्या करातून घेतात, मग ते ठेकेदाराचे गुलाम का बनले आहेत? ठेकेदारावर कारवाई का होत नाही?

नेत्यांचे रस्ते चकाचक: प्रत्येक नेत्याच्या दारापर्यंत डांबरी रस्ता पोहोचतो, मग सर्वसामान्यांच्या या मुख्य रस्त्याकडे ३ वर्षांपासून हेतुपुरस्सर दुर्लक्ष का केले जात आहे? लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या पत्रकार बांधवांनी या समस्येवर वारंवार प्रकाश टाकला. मात्र, निगरगट्ट प्रशासन कोणतीही हालचाल करायला तयार नाही. रस्त्यावर साधे पाणी मारण्याचे सौजन्यही ठेकेदार दाखवत नसल्याने व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे.रखडलेले काम युद्धपातळीवर सुरू न झाल्यास रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल.

## शाळांमधून मराठीपण हरवणे चिंताजनक - प्रा. डॉ. संगीता पवार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत




**बुलढाणा :** मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीसमोर आज अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून मराठीपणाची जाणिव हरवत चालली आहे. केवळ अनिवार्य म्हणून मराठी शिकवण्याची औपचारिकता पाळली जाते. मराठी भाषेचा खऱ्या अर्थाने गौरव करायचा असेल तर स्वतःचे मराठीपण जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत साहित्यिका प्रा. डॉ. संगीता पवार-काळणे यांनी येथे केले. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाचे बुलढाणा केंद्र व अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्फे स्थानिक इंटक सोसायटीच्या सभागृहात २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात व्याख्यान देताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जेष्ठ कवी सर्जेराव चव्हाण हे होते. जेष्ठ नाट्यकर्मी चंद्रशेखर केणे व बाळ महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. नटराज पूजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कामगार कल्याण व अक्षरदेहतर्फे सौ. विद्या शिंदे , निलेश देशमुख, विजय सोनोने, अमोल कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवरांचा सन्मानचिन्ह, शाल, मोत्याची माळ व पुष्प देवून सत्कार केला. 'कुसुमाग्रज व मराठी भाषा गौरव दिन' या विषयावरील व्याख्यानात पुढे बोलताना प्रा. डॉ. सौ. संगीता पवार-काळणे यांनी मराठी भाषेचा इतिहास व कुसुमाग्रजांचे साहित्याच्या माध्यमातून भाषिक योगदानाबद्दल सखोल व अभ्यासू विवेचन केले. यावेळी जेष्ठ नाट्यकर्मी बाळ महाजन व चंद्रशेखर केणे यांनी बुलढाणा शहरातील नाट्य चळवळीचा समृध्द इतिहास सांगताना निळू फुले आणि श्रीराम लागू यांच्यासह मराठीतील दिग्गज नाट्य कलावंतांनाही बुलढाण्याच्या नाट्य संस्कृतीचा विलक्षण आदर असायचा, अशी माहिती दिली. २५५ मराठी शाळा बंद करुन मराठी गौरव दिन कसा साजरा करणार ? - चव्हाण विदर्भ व मराठवाड्यातील एकूण २५५ मराठी शाळा बंद पडल्याची माहिती सरकारकडूनच देण्यात आली. अशा अवस्थेत मराठी गौरव दिन कसा साजरा करायचा असा प्रश्न जेष्ठ कवी सर्जेराव चव्हाण यांनी अध्यक्षीय भाषणातून उपस्थित केला. मराठी दीन झाली आहे असे सांगून त्यांनी मराठी जगविण्यासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखून वागले पाहिजे, असे आवाहन केले. यावेळी अक्षरदेह नाट्यकला संस्थेचे अध्यक्ष तथा नाट्य लेखक व कलावंत शशिकांत इंगळे यांनी त्यांच्या "थियरी ऑफ कौशल्यायन" या नाट्यसंहितेचे वाचन केले. नाट्य कलावंत गणेश राणे यांनी कामगार कल्याण मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन शशिकांत इंगळे यांनी केले तर कामगार कल्याण मंडळाच्या बुलढाणा केंद्र संचालिका सौ. विद्या शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नाट्य क्षेत्रातील विजय सोनोने, अमोल कुलकर्णी, दिनेश उचाडे पाटील, रविकिरण टाकळकर, अण्णासाहेब जाधव, तुषार काचकुरे, पवन बाबरेकर, शुभम गवई, मयुर परमार, योगेश जाधव, शैलेश बनसोड, अभिलाष चौबे, प्रा. शैलेश वारे, डॉ. दुर्गासिंग जाधव , डॉ. सौ. निलिमा जाधव, सौ. सविता सोनोने , सौ. कल्याणी साखरे, योगेश सोनुने, मंगेश जाधव, दत्तात्रय खाचणे, वल्लभ पाटील, चिन्मय राणे यांच्यासह नाट्य रसिक व साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष पाटील, विलास मानवतकर, सौ. रुचिरा पाटील, सौ. सुरेखा इंगळे यांनी परीश्रम घेतले.

प्रो.प्रा. ज़ाकीर खान
Mob- 9322174042
जबान मिठी हो तो बादशाह बना देती है
चाय मिलेंगी
बरकत केलाई दही लस्सी सेंटर
•मलाई लस्सी •दही लस्सी •मँगो लस्सी
• फालुदा लस्सी • रुहअफज़ा लस्सी •पायनॅपल
•निंबु शरबत •ऑरेज शरवत • गुलाब शरवत
•मुंगो शरबत •रुह अफज़ा शरबत •काला खट्टा •खश
पत्ता - चिखली, जिल्हा बुलढाणा